केंद्र पुरस्कृत इंदिरा गांधी राष्ट्रीय विकलांग निवृत्तीवेतन योजना सन २०१८-१९ या आर्थिक वर्षातील माहे एप्रिल, २०१८ ते जुलै, २०१८ करिता अनुदानाचे वितरण.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक: इंगांअ -२०१८/प्र. क्र. ५६/विसयो
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- २४ मे, २०१८.

वाचा :-

१. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, क्र. विसयो २०१०/प्र.क्र.१७५/ विसयो २, दि. २६ ऑक्टोबर २०१०.
२. शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.मकोनी-१०१०/प्र.क्र.३२/कोषा-प्र.५, दि. २८ मे, २०१२.
३. शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि. २ एप्रिल, २०१८.
४. शासन ज्ञापन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक बीजीटी २०१८/प्र.क्र.५४/ अर्थसंकल्प, दिनांक १६ एप्रिल, २०१८.

शासन निर्णय :-

सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरिता केंद्र पुरस्कृत इंदिरा गांधी राष्ट्रीय विकलांग निवृत्तीवेतन योजनेच्या अंमलबजावणीसाठी रुपये २,६१,००,०००/- (रुपये दोन कोटी एकसष्ठ लक्ष फक्त) एवढी अर्थसंकल्पीय तरतूद मंजूर झालेली आहे. वित्त विभागाचे संदर्भ क्रमांक ३ येथील शासन परिपत्रकाच्या अनुषंगाने केंद्र पुरस्कृत इंदिरा गांधी राष्ट्रीय विकलांग निवृत्तीवेतन योजनेसाठी एकूण तरतूदीच्या ७० टक्केपैकी, एप्रिल, २०१८ ते जुलै, २०१८ या कालावधीच्या खर्चासाठी रुपये ८१,२०,०००/- (रुपये एक्याऐंशी लक्ष वीस हजार फक्त) वितरीत करण्यास शासन याद्वारे मान्यता देत आहे. तसेच मासिक विवरण पत्रानुसार निधी पुढे / मागे ओढून घेण्याची सुविधा अर्थसंकल्पीय अंदाज वितरण व सनियंत्रण प्रणालीवर देण्यात आलेली आहे.

२. सर्व जिल्हाधिकारी यांना कळविण्यात येते की, सोबतच्या विवरणपत्रातील स्तंभ क्र.३ New CO Code वर संबंधित जिल्हयाना निधी वितरीत करण्यात आलेला आहे. त्यांनी वितरीत केलेल्या अनुदानाचे वाटप त्यांच्या जिल्हयातील तालुक्यांना लाभार्थ्यांच्या प्रमाणानुसार करावे. सदरचे अनुदान वितरण जिल्हाधिकाऱ्यांनी कळविलेल्या लाभार्थ्यांच्या संख्येनुसार करण्यात आले आहे. संदर्भ क्र.२ येथील परिपत्रकानुसार उणे पध्दतीने प्राधिकारपत्र काढण्यास मुभा आहे.

३. सदरहू निधीमधून झालेला खर्च "मागणी क्रमांक एन-३, मुख्य लेखाशीर्ष २२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण, १०४-वृध्द विकलांग व निराश्रीत व्यक्तींचे कल्याण, (०८) (१२) इंदिरा गांधी राष्ट्रीय विकलांग निवृत्तीवेतन योजना (केंद्र पुरस्कृत योजना) (कार्यक्रम), ५० इतर खर्च, (२२३५ बी ०४९) "या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकावा.

४. सर्व जिल्हाधिका-यांना कळविण्यात येते की, त्यांनी संदर्भ क्र.३ येथील वित्त विभागाच्या परिपत्रकातील अटी व शर्तीची पुर्तता करुन कोषागारात देयके सादर करण्याची दक्षता घ्यावी.

५. सर्व जिल्हाधिकाऱ्यांना कळविण्यात येते की, त्यांनी हा खर्च कोणत्याही परिस्थितीत त्यांच्याकडे सुपूर्द करण्यात आलेल्या अनुदानापेक्षा जास्त होणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी.

६. सर्व जिल्हाधिकाऱ्यांना कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्याकडे सुपूर्द करण्यात आलेल्या अनुदानातून केलेल्या खर्चाचा महालेखापालांच्या कार्यालयात नोंदविलेल्या खर्चाशी ताळमेळ घालून त्याप्रमाणे ताळमेळाचे विवरणपत्राची प्रत या विभागाच्या लेखा परीक्षण कार्यासनास व या कार्यासनास पाठवावी. तसेच उपयोगिता प्रमाणपत्र महालेखापालांच्या कार्यालयास त्वरित पाठवावीत व त्याची प्रत या विभागाच्या नियोजन कार्यासनास व या कार्यासनास पाठवावी. खर्चाच्या ताळमेळाचे काम व्यवस्थितरित्या पार न पाडल्यास, तसेच उपयोगिता प्रमाणपत्र महालेखापालांच्या कार्यालयास विहित वेळेत सादर न केल्यास, त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत जिल्हाधिकाऱ्यांवर राहील.

७. हा शासन निर्णय वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्रमांक १९५/२०१८/व्यय १४, दिनांक १६.०५.२०१८ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१८०५२४१२३४४२६२२२ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Siddharth Amrutrao Zalte

Digitally signed by Siddharth Amrutrao Zalte
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice and Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=dc54b49c6f5c903027053476b3a6ef50b46ff44a7e8b820fef7bfdd100c56194, cn=Siddharth Amrutrao Zalte
Date: 2018.05.24 12:34:39 +05'30'

(सि. अ. झाल्टे)
अवर सचिव , महाराष्ट्र शासन

प्रति,

१) विभागीय आयुक्त, पुणे/कोकण/नाशिक/नागपूर/अमरावती व औरंगाबाद,
२) सर्व जिल्हाधिकारी.
३) संचालक, लेखा व कोषागारे, नवीन प्रशासकीय भवन, ५ वा मजला, महाराष्ट्र राज्य ,मुंबई
४) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई (२ प्रती)
५) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
६) महालेखापाल, महाराष्ट्र १/२, (लेखा परिक्षा / लेखा अनुज्ञेयता(, मुंबई / नागपूर.
७) वित्त विभाग, अर्थसंकल्प ३ ,४, ५ अर्थोपाय व व्यय १४, मंत्रालय, मुंबई
८) उप सचिव (अर्थसंकल्प), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) सहाय्यक संचालक (वित्त व लेखा), लेखापरिक्षण कक्ष, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) निवड नस्ती, विसयो.

ANNEXTURE

Accompinement of Government Resolution No.IGH-2018/C.R.56/ Visayo, Dated : 24 May, 2018

Release of grant for 2018-19

Indira Gandhi National Disability Pension Scheme (2235 B049)

Sr.no	District	New CO Code	Indira Gandhi National Handicapped Pension Scheme No. Of. Beneficiaries Rs. 200/- P.M	Apr-18	May-18	Jun-18	Jul-18	Total Amount Released Vide this order (9=5+6+7+8)
1	2	3	4	5	6	7	8	9
1	Mumbai	N0028	0	0	0	0	0	0
2	Mumbai Suburban	N0029	0	0	0	0	0	0
3	Thane	N0036	0	0	0	0	0	0
4	Raigad	N0012	206	57687	57687	57687	57687	230748
5	Ratnagiri	N0023	155	43405	43405	43405	43405	173620
6	Sindhudurg	N0018	147	41165	41165	41165	41165	164660
7	Palghar	N0037	37	10361	10361	10361	10361	41444
	Total Kokan		**545**	**152618**	**152618**	**152618**	**152618**	**610472**
8	Nashik	N0006	338	94653	94653	94653	94653	378612
9	Dhule	N0026	87	24363	24363	24363	24363	97452
10	Jalgaon	N0010	459	128537	128537	128537	128537	514148
11	Ahmednagar	N0030	60	16802	16802	16802	16802	67208
12	Nandurbar	N0027	367	102774	102774	102774	102774	411096
	Total Nashik		**1311**	**367129**	**367129**	**367129**	**367129**	**1468516**
13	Pune	N0040	115	32204	32204	32204	32204	128816
14	Solapur	N0019	220	61608	61608	61608	61608	246432
15	Satara	N0032	94	26323	26323	26323	26323	105292
16	Sangali	N0008	144	40325	40325	40325	40325	161300
17	Kolhapur	N0039	180	50406	50406	50406	50406	201624
	Total Pune		**753**	**210866**	**210866**	**210866**	**210866**	**843464**
18	Nagpur	N0014	98	27443	27443	27443	27443	109772
19	Wardha	N0025	446	124897	124897	124897	124897	499588
20	Chandrapur	N0021	747	209188	209188	209188	209252	836816
21	Bhandara	N0033	189	52927	52927	52927	52927	211708
22	Gadchiroli	N0013	4	1120	1120	1120	1120	4480
23	Gondia	N0024	265	74210	74210	74210	74210	296840
	Total Nagpur		**1749**	**489785**	**489785**	**489785**	**489849**	**1959204**
24	Amaravati	N0011	389	108935	108935	108935	108935	435740
25	Akola	N0041	294	82331	82331	82331	82331	329324
26	Yavatmal	N0007	257	71969	71969	71969	71969	287876
27	Buldhana	N0038	515	144219	144219	144219	144219	576876
28	Washim	N0022	56	15682	15682	15682	15682	62728
	Total Amaravati		**1511**	**423136**	**423136**	**423136**	**423136**	**1692544**
29	Aurangabad	N0035	44	12321	12321	12321	12321	49284
30	Beed	N0034	240	67209	67209	67209	67209	268836
31	Nanded	N0031	41	11481	11481	11481	11481	45924
32	Parbhani	N0016	118	33044	33044	33044	33044	132176
33	Osmanabad	N0020	261	73090	73090	73090	73090	292360
34	Jalana	N0015	243	68049	68049	68049	68049	272196
35	Latur	N0009	369	103334	103334	103334	103334	413336
36	Hingoli	N0017	64	17922	17922	17922	17922	71688
	Total Aurangabad		**1380**	**386450**	**386450**	**386450**	**386450**	**1545800**
	Grand Total		**7249**	**2029984**	**2029984**	**2029984**	**2030048**	**8120000**